सामना

# श्री मार्तंड देवसंस्थान जेजुरी

( रजि. नं. ए.-७०८ )

**श्री क्षेत्र जेजुरी, ता. पुरंदर, जि. पुणे**

## जाहीर निविदा

**श्री खंडोबा देवाचा सोमवती उत्सव सोहळा सोमवार दिनांक १५/०६/२०२६ रोजी श्री क्षेत्र जेजुरी येथे साजरा होत असून, त्यानिमित्त येणारे भाविक-भक्त, खांदेकरी, मानकरी ग्रामस्थांच्या सोईसुविधांसाठी खालीलप्रमाणे जाहीर निविदा मागविण्यात येत आहेत :-**

(१) ग्रामदेवी जानाई मंदिराबाहेर साधारण २५ x २० आकाराचा व धालेवाडी रेल्वे गेट शेजारी अल्पोपाहार या ठिकाणी २० x ३० आकाराचा पत्रा मंडप व्यवस्था करणे. (प्रत्यक्ष पाहणी करून निविदा देणे.)

(२) जेजुरी (छत्रपती शिवाजी महाराज चौक) ते धालेवाडी रस्ता (रेल्वेगेट) ते कऱ्हा नदी तीरापर्यंत पालखी सोहळा मार्गावरील रस्त्याची साफसफाई व दुरुस्ती करणे. (प्रत्यक्ष पाहणी करून निविदा देणे.)

(३) धालेवाडी रस्ता (रेल्वेगेट) ते विद्यानगर व्हाया कोरपड मळा पालखी सोहळा मार्गावरील रस्त्याची साफसफाई व दुरुस्ती करणे. (प्रत्यक्ष पाहणी करून निविदा देणे.)

(४) पालखी सोहळयापुढे जनरेटरसहित वीज व्यवस्था तयार करणे.

(५) पालखी सोहळयामध्ये सहभागी झालेल्या खांदेकरी, मानकरी व ग्रामस्थ यांना ७०० नग गांधी टोपी पुरविणे.

(६) पालखी सोहळयापुढे सहभागी झालेल्या भाविक, खांदेकरी, मानकरी व ग्रामस्थ यांना धालेवाडी रस्ता (रेल्वेगेट) शेजारी चहापान, अल्पोपाहार व्यवस्था साधारण ४००० प्लेट व पिण्याच्या पाण्याची २०० ML बाटली (देवसंस्थान नावासहित) व्यवस्था करणे.

(७) श्री खंडोबा देवाचा सोमवती अमावास्या उत्सव सोहळयानिमित्त श्री खंडोबा मंदिर गडकोट सज्जास सर्व बाजूने विद्युत रोषणाई तसेच आधुनिक व आकर्षक फायर शो करणे. (प्रत्यक्ष पाहणी करून निविदा देणे.)

(८) श्री खंडोबा मंदिर गडकोटावर पालखी सोहळा संपन्न झाल्यानंतर सहभागी असलेल्या भाविक, खांदेकरी, मानकरी व ग्रामस्थ यांना साधारण १००० प्लेट भोजनाची व्यवस्था करणे.

(९) पालखी सोहळयामध्ये सहभागी भाविकांना सुलभ दर्शन देणेसाठी व गर्दीचे नियोजन करणेकामी ५० सुरक्षारक्षक (कमांडो) पुरविणे.

(१०) सोमवती अमावास्या यात्रेनिमित्त पालखी सोहळयाचे/गर्दीचे/वाहतुकीचे नियोजन करणे हेतू जेजुरी शहरातील मुख्य चौकांमध्ये बॅरिकेट्स तयार करणे. (प्रत्यक्ष पाहणी करून निविदा भरणे.)

(११) सोमवती अमावास्या यात्रेनिमित्त श्री खंडोबा मंदिर गडकोटामध्ये फुलांची सजावट करणे. (प्रत्यक्ष पाहणी करून निविदा भरणे.)

(१२) सोमवती अमावास्या पालखी सोहळयाची फोटोग्राफी व व्हिडीओ शूटिंग करणे. (प्रत्यक्ष पाहणी करून निविदा भरणे.)

(१३) पालखी सोहळयाच्या बंदोबस्तासाठी आलेले पोलीस अधिकारी, कर्मचारी तसेच कमांडो यांच्या भोजनाची व्यवस्था करणे. (प्रत्यक्ष पाहणी करून निविदा देणे.)

(१४) श्री मार्तंड देवसंस्थान न्यासातर्फे शालेय गरजू विद्यार्थी-विद्यार्थिनींना साहाय्य म्हणून वह्या वाटप करणे हेतू चांगल्या प्रतीच्या छापील वह्या पुरविणे. (प्रत्यक्ष माहिती घेऊन कोटेशन भरणे.)

(१५) श्री मार्तंड देवसंस्थान न्यासातर्फे शालेय विद्यार्थी- विद्यार्थिनींना साहाय्य म्हणून दप्तरवाटप करणे हेतू छापील दफ्तरे पुरविणे. (प्रत्यक्ष माहिती घेऊन दरपत्रक भरणे.)

**टीप :-** १) उपरोक्त कामांबाबत ऐच्छिक देणगीदार असल्यास कृपया श्री मार्तंड देवसंस्थान कार्यालयाशी संपर्क साधावा. (मो.क्र.-९३७०४५९४३३/९७६३०४४०१७)

२) इच्छुक टेंडरधारकांनी आपली निविदा संबंधित कामाचा अनुभव व आवश्यक कागदपत्रांसह सादर करावी.

**नियम व अटी -**

१. निविदा फॉर्म जमा केलेली संस्था/व्यक्ती निविदा फॉर्म खोलते/उघडतेवेळी कोणतीही पूर्वकल्पना न देता उपस्थित नसल्यास सदरचा फॉर्म प्रक्रियेतून बाद केला जाईल.

२. निविदा भरणेकामी फॉर्म फी रु.५००/- देवसंस्थान कार्यालयामध्ये जमा करून रीतसर पावती घ्यावी.

३. इच्छुक टेंडरधारकांनी आपल्या निविदा दि. ११/०५/२०२६ पर्यंत स.९ ते ५ या वेळेत खालील पत्त्यावर जमा कराव्यात.

४. निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार विश्वस्त मंडळाने राखून ठेवलेला आहे.

**निविदा जमा करण्याचे ठिकाण**

श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी

'मल्हार' भक्तनिवास (दुर्गामाता चौक)

जेजुरी, ता.पुरंदर, जि.पुणे.

सही/-
**आशीष मारुती बाठे**
व्यवस्थापक
श्री मार्तंड देवसंस्थान जेजुरी

सही/-
**ॲड. विश्वास गोविंद पानसे**
अध्यक्ष
श्री मार्तंड देवसंस्थान जेजुरी


Powered by: erelego.com